## सर्वसाधारण सूचना.

१) परीक्षार्थी मित्र मैत्रिणींनो मराठी व्याकरणाचा अभ्यास करताना प्राथमिक अभ्यासाला महत्व देणे खूप गरजेचे आहे उदा: मराठी भाषा दिवस, सुरवात, वर्णमाला, भाषेचा उगम, शब्दभांडार .

२) जर तुम्ही सरळसेवा भरतीचा अभ्यास करत असाल तर प्राथमिक स्वरूपाचा अभ्यास करा, जास्त खोलात जाण्याची गरज पडणार नाही, जर वेळ असेलच तर मो.रा.वाळिंबे / शिंदे सरांच मराठी ग्रामर पुस्तक अभ्यासा. संकल्पना स्पष्ट होतील.

३) मराठी व्याकरणाचा मागच्या प्रश्नांचा जास्तीत जास्त अभ्यास आणि सराव करा. सर्व प्रकारचे सराव पेपर आणि मागील झालेले पेपर www.marathivyakaran.com या साईट वर उपलब्ध आहेत ,

४) शब्दसंग्रह वाढवा समजून घ्या , उच्चार, अर्थ, समान अर्थ , विरुद्ध अर्थ, शब्दसमूहाबद्दल ऐक शब्द, या सारखी प्रश्न सहज सुटतिल.

५) विरामचिन्हे , वर्णमाला , लेखन विषयक नियमावली आणि साहित्य संदर्भ, व्यवस्तीत पाहिल तर लक्षात येईल ५०% भाग या संबंधित प्रश्न असतात.

६) बाकी प्रश्न वाक्य संश्लेषण संबंधित (म्हणजेच प्रयोग, समास, शब्दसिद्धी, वृत्त, अलंकार) या समबंधीत असतात.अभ्यास करताना सुद्धा दोन ग्रुप करून सराव करा यातिल बरीच प्रकरणे ऐकमेकास पूरक आहेत.

७) परीक्षार्थी मित्रांनो सदरील नोट्स मधील माहिती ही इंटरनेटचा आधार घेऊन मिळवलेली आहे. त्यामुळे माझ्याकडून मी अचूक माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. नजर चुकीणे काही चूक आढळून आलीच तर मलाही कळवा आणि तुम्हीही दुरुस्त करा.

८) सरळसेवा परीक्षे मधील सर्व परीक्षेसाठी मराठी व्याकरण अभ्यासक्रम जवळपास एकाच स्वरूपात असते, तरी सुद्धा तलाठी भरती मध्ये काठिन्य पातळी पदवी आहे त्यामुळे अभ्यास करताना काठिन्य पातळी तपासून पाहणे गरजेचे राहील .

९) सदरील नोट्स चा वापर सराव / रिवीजन म्हणून करावा, अगोदरच संकल्पना स्पष्ट असतील तर उत्तम. तेव्हा तुम्ही याचा चांगला उपयोग करून घेऊ शकता.

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | पान नंबर |
|---|---|---|
| 1) मराठी व्याकरण ओळख | - | 03 |
| 2) वर्णमालेचे प्रकार | - | 04 |
| 3) व्यंजने | | 05 |
| 4) शब्दांच्या जाती | - | 08 |
| 5) वचन विचार | - | 13 |
| 6) विभक्ती | - | 15 |
| 7) सामान्य रूप | - | 18 |
| 8) काळ | - | 19 |
| 9) प्रयोग - समास | - | 21 |
| 10) वाक्यांचे प्रकार | - | 27 |
| 11) संधि | - | 29 |
| 12) शब्दसिद्धी | - | 32 |
| 13) अलंकार - विरामचिन्ह याविषयी माहिती | - | 34 |
| 14) समानार्थी शब्द | - | 34 |
| 15) मराठी म्हणी - वाकप्रचार | - | 39 |
| 16) अशुद्ध – शुद्ध शब्द | - | 45 |
| 17) सजीव – निवास / प्राणी - पील्ल / प्रसिद्ध व्यक्ती - विशेषण | - | 46 |
| 18) प्राणी / वस्तु – संच / आत्मचरित्र | - | 48 |
| 19) साहित्यिक व त्यांची विशेष नावे ( टोपण नावे ) | - | 49 |
| 20) व्यक्ति प्रचारक शब्द / आवाज | - | 50 |

# मराठी व्याकरण

**भाषा म्हणजे, भावना विचार कल्पना व अनुभव व्यक्त करण्याचे साधन होय .**
भाषा मुख्यतः दोन प्रकारची आहे.
१. स्वाभाविक / नैसर्गिक
२. कृत्रिम / सांकेतिक

मनुष्यप्राण्याची म्हणजेच आपली बोलण्याची भाषा किंवा हावभावाची भाषा ही नैसर्गिक भाषा म्हणून ओळखल्या जाते. 'भाषा' हा शब्द 'भाष' या संस्कृत धातूपासून आला असून त्याचा अर्थ बोलणे किंवा बोलण्याचा व्यवहार करणे असा आहे.

लिहिण्यासाठी आपण लिपी वापरतो. लिपीचा शोध लागल्यामुळे लेखन शक्य झाले आहे. भाषा हे एक संवादाचे प्रभावी माध्यम आहे. बोलणारा व ऐकणारा यांना जोडणारा पूल म्हणजे भाषा होय.

आपल्या घरात बोलली जाणारी भाषा म्हणजे मातृभाषा होय. मराठी आपली मातृभाषा आहे.

संस्कृत भाषा ही मराठीची जननी होय. मराठी भाषेतील पहिला शिलालेख कर्नाटकातील श्रवणबेळगोल येथील श्रीगोमटेश्वराच्या मूर्तीखाली आढळतो. 'श्री चामुण्डराये करवियले' ही शिलालेखातील ओळ म्हणजे मराठीतील पहिले उपलब्ध वाक्य होय. इसवी सन ९८३ च्या सुमारास हे वाक्य तिथे कोरले गेले असावे.

विवेकसिंधू हा ग्रंथ लिहिणारे आद्यकवी मुकुंदराज, श्री ज्ञानदेवी आणि अमृतानुभव हे अलोकिक ग्रंथ लिहिणारे श्री ज्ञानदेव यांनी मराठी भाषा संपन्न केली. 'लीळाचरित्र' हा आद्यगद्यग्रंथ लिहिणारे म्हाइट मराठीतील प्रारंभीच्या काळातील प्रसिद्ध ग्रंथकार होत...

**महाराष्ट्राची राजभाषा मराठी आहे. २७ फेब्रुवारी हा जेष्ठ साहित्यिक** विष्णू वामन शिरवाडकर यांचा जन्मदिवस

विष्णू वामन शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस जागतिक मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो.
आपण जी लिपी वापरतो, तिचे नाव देवनागरी लिपी आहे. बाळबोध लिपी असेही तिला म्हणतात. आपली हि देवनागरी लिपी उभ्या, आडव्या, तिरप्या, गोलसर अशा रेषांनी बनलेली

# वर्णमालेचे प्रकार

स्वर : मुखावाटे बाहेर पडणाऱ्या मूळ ध्वनींना स्वर असे म्हणतात.

ऱ्हस्व स्वर : ज्या स्वराचा उच्चार करण्यास कमी वेळ लागतो त्यास - हस्वस्वर असे म्हणतात.
उदा: अ, इ, उ, ऋ, लृ

दीर्घस्वर : ज्या स्वरांचा उच्चार करण्यासाठी जास्त वेळ लागतो, त्यास दीर्घस्वर असे म्हणतात. उदा : 'आ, ई, ऊ'

संयुक्त स्वर :दोन स्वर एकत्र येऊन तयार होणाऱ्या स्वरांना संयुक्त स्वर म्हणतात. उदा : ए, ऐ, ओ, औ. सजातीय स्वर व विजातीय स्वर : अ-आ, इ-ई, उ-ऊ

## व्यंजने

व्यंजणाचे प्रकार

- स्पर्श व्यंजन : ज्या व्यंजनाचा उच्चार करताना जीभ, कंठ, दात, तालू, ओठ, यांच्याशी त्याचा स्पर्श होऊन हे वर्ण
  उच्चारले जातात. म्हणून त्यांना स्पर्श व्यंजन असे म्हणतात.

- अनुनासिके : ज्या वर्णांच्या उच्चाराबरोबर त्यांचा उच्चार नाकातून होतो म्हणून त्यांना अनुनासिक असे म्हणतात.
  उदा: ङ, ञ, ण, न, म

- कठोर : ज्या व्यंजनाच्या उच्चारामध्ये तीव्रता दिसते त्यास कठोर व्यंजने म्हणतात.
  उदा: क्, ख्, च्, छ्, ट्, ठ्, त्, थ्, प्, फ्,

- मृदु वर्ण:- ज्या वर्णांचा उच्चार सौम्यपणे होतो त्यांना मृद वर्ण असे म्हणतात किंवा ज्या व्यंजनांचा उच्चार हळुवार असतो किंवा नाजूक असतो त्यांना मृदु वर्ण म्हणतात.
  उदाहरणार्थ:-ग, घ ज, झ ड, ढं द, ध भ

## जोडाक्षरांचे लेखन

- एकच व्यंजन दोन वेळा जोडले गेले की त्या संयुक्त व्यंजनाला द्वित असे म्हणतात.

उदाहरणार्थ:- क + क - क्क, त + त - त्त

- ज्या अक्षरात दोन किंवा अधिक व्यंजने एकत्र येऊन शेवटी त्यात एक स्वर मिसळतो त्यास जोडाक्षरे असे म्हणतात. उदाहरणार्थ:- विद्यालय मध्ये या (द + य + आ ) मध्ये उभा दंड असणारी व्यंजने - क, फ

✓ शेवटी उभा दंड असणारी व्यंजने ग, ण, श
✓ अर्धा दंड असणारी आणि अर्धी होऊ शकणारी व्यंजने छ ळ
✓ अर्धा दंड असणारी पण अर्धी होऊ न शकणारी व्यंजने ट, ठ, ड, ढ, द, ह
✓ दंड नसलेले व्यंजन - र

मराठीत प्रत्येक वर्णाचा पूर्णोच्चार होतो. त्याशिवाय त्याचे लांबट व तोकडा असेही उच्चार होतात.

## शब्द आणि पद :-

तोंडावाटे निघणा-या मूलध्वनींना आपण वर्ण असे म्हणतो.
हे ध्वनी आपण कागदावर लिहून दाखविताना विशिष्ट चिन्हे दाखवितो, वापरतो. हे ध्वनींच्या चिन्हांना आपण अक्षरे असे म्हणतो.

उदाहरणार्थ:-
ब, द, क ही तीन अक्षरे आहेत. ही अक्षरे विशिष्ट क्रमाने आल्यामुळे त्यांना अर्थ प्राप्त झाला आहे, म्हणून 'बदक' हा शब्द तयार झाला.

एखाद्या शब्दाला किंवा शब्दसमूहाला पूर्ण अर्थ प्राप्त झाला तर त्याला आपण वाक्य असे म्हणतो.
'बदक पाण्यात पोहते' हे वाक्य आहे.
या वाक्यात तीन पदे आहेत. पद व शब्द यांत थोडा फरक आहे.
'पाणी' हा शब्द आहे. 'पाण्यात' हे पद आहे.

# शब्दांच्या जाती

शब्दांचे आठ प्रकार आहेत त्यांनाच शब्दांच्या आठ जाती असे म्हणतात. बदल होणे याला व्याकरणात विकार असे म्हणतात.
शब्दांच्या आठ जातींपैकी नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद ही चार विकारी आहेत म्हणजेच त्यांच्यात लिंग, वचन, विभक्ती यामुळे बदल होतो.

क्रियाविशेषण, शब्दयोगी, उभयान्वयी व केवलप्रयोगी ही चार अविकारी आहेत म्हणजेच त्यांच्यात लिंग, वचन, विभक्ती यामुळे बदल होत नाही.

विकारी व अविकारी यांना अनुक्रमे सव्यय व अव्यय असे म्हणतात.

**१. नाम** - वाक्यात येणा-या शब्दांपैकी जे शब्द प्रत्यक्षात असलेल्या किंवा काल्पनिक वस्तूंची किंवा त्यांच्या गुणांची नावे असतात, त्यांना नाम असे म्हणतात.
उदाहरणार्थ - फूल, हरी, गोडी इत्यादि

- व्यक्ती वाचक संज्ञा :सीताराम,गोपाल.
- जातीवाचक संज्ञा :गाव,नदी.
- भाववाचक संज्ञा :लहानपण,धैर्य.
- समूह वाचक संज्ञा :भीड,संघ .

**२. सर्वनाम** - जे शब्द कोणत्याही प्रकारच्या नामांच्या ऐवजी येतात त्यांना सर्वनाम असे म्हणतात.
उदाहरणार्थ - मी, तू, हा, जो, कोण इत्यादी

- पुरुषवाचक सर्वनाम : मी,तु.
- निश्चय वाचक सर्वनाम : हे ,ते,त्या,
- अनिश्चय वाचक सर्वनाम : कोणी,काही.
- संबंध वाचक सर्वनाम : जो,जी ,जे .
- प्रश्न वाचक सर्वनामे :का? काय? कोठे? कोण? कोणाला? कोणाचा? कोणता ? केंव्हा ?

# विभक्ती

- ✓ वाक्यातील शब्दांचा त्यातील मुख्य शब्दाशी किंवा इतर शब्दांशी जो काही संबंध असतो त्या संबंधाला व्याकरणात कारक असे म्हणतात.

- ✓ वाक्यातील शब्दांचा संबंध दाखविण्यासाठी नाम किंवा सर्वनाम यांच्या स्वरुपात जो बदल किंवा विकार होतो त्याला व्याकरणात विभक्ती असे म्हणतात.

- ✓ शब्दातील नाम, सर्वनाम किंवा तत्सम विकारी शब्द यांचे वाक्यातील क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी येणारे संबंध ज्या विकारांनी दाखविले जातात त्यांना विभक्ती म्हणतात.

- ✓ नामे व सर्वनामे यांचे वाक्यातील क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी येणारे संबंध ज्या विकारांनी दाखविले जातात त्या विकारांना विभक्ती असे म्हणतात.

- ✓ नामाचे किंवा सर्वनामाचे विभक्तीचे रूप तयार करण्यास त्याला जी अक्षरे जोडतात त्यास प्रत्यय असे म्हणतात.

- ✓ शब्दांना जी अक्षरे जोडली जातात किंवा शब्दांना बदल ज्या अक्षरांनी दाखवला जातो त्यांना विभक्तीचे प्रत्यय म्हणतात.
- ✓ उदा. ल्या, ल, ला, ली

- ✓ विभक्ती प्रत्यय लावण्यापूर्वी नामाच्या किंवा सर्वनामाच्या स्वरूपात जो बदल होतो त्याला सामान्य रूप असे म्हणतात .

- ✓ वाक्यात नामाचा किंवा सर्वनामाचा क्रियापदाची जो संबंध असतो त्याला कारकसंबंध असे म्हणतात आणि त्या विभक्तीला कारक विभक्ती अस म्हणतात वाक्यातील नाम किंवा सर्वनाम यांचे क्रियापदासाठीचे संबंध असतात त्यांना कारकार्थ असे म्हणतात आणि क्रियापदाचे व इतर शब्दांशी असलेले संबंध असतात त्या संबंधांना उपपदार्थ असे म्हणतात

# काळ

सर्वात महत्त्वाचे काम वाक्यामध्ये क्रियापद करते. आपल्याला वाक्याचा काळ क्रियापदामुळेच समजला जातो. काळाचे प्रमुख तीन प्रकार आहे. वर्तमानकाळ भूतकाळ भविष्यकाळ

काळ कसा ओलखायचा - वाक्यात क्रियापद एकटेच आले असेल तर तो कोणता ना कोणता साधा काळ असतो.

साधा वर्तमान काळ लिहतो, पळते, वाचतो इ.

साधा भूतकाळ - लिहिले, पळाली, वाचले इ.

साधा भविष्यकाळ - लिहील, पळेल, वाचेल इ.

संयुक्त क्रियापदाचा चालू/पूर्ण/रिती काळ असतो. परंतु साधा काळ कधीच नसतो.

रिती काळ रिती वर्तमानकाळ - असतो, असते, असतात.

रिती भूतकाळ - असे, असू इ.

रिती भविष्यकाळ जाईल, जातील इ. –

**थोडक्यात पुढील प्रमाणे पाहू .**

१. वर्तमानकाळ २. भूतकाळ ३. भविष्यकाळ

वर्तमानकाळ : क्रिया चालू आहे याचा बोध होतो.

उदा : १. मी आंबा खातो. २. तो पत्र लिहतो.

२. भूतकाळ : क्रिया पाठीमागील काळात घडली आहे असा बोध होतो.

उदा : १. मी आंबा खाल्ला होता. २. मी पत्र लिहीत होतो.

3.भविष्यकाळ : क्रिया पुढे घडेल याचा बोध होतो.

उदा : १. मी आंबा खाईन २. मी पत्र लिहीन

| प्रकार | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|
| साधा | मी केक खातो | मी केक खाल्ला | मी केक खाईल |
| चालू | मी केक खात आहे | मी केक खात होतो | मी केक खात असेल |
| पूर्ण | मी केक खाल्ला आहे | मी केक खाल्ला होता | मी केक खाल्लेला असेल |
| रीती | मी केक खात असतो | मी केक खात असे | मी केक खात जाईल |

**काळाच्या तीन प्रकारावरून काळाचे चार उपप्रकार पडतात ते वरील प्रमाणे .**

# प्रयोग

भाषेचे प्रयोग व त्याचे प्रकार

वाक्यातील कर्ता, कर्म, व क्रियापद यांच्या एकमेकांमधील परस्पर संबंधाला प्रयोग असे म्हणतात." प्रयोग वाक्याचे महत्वाचे घटक तीन आहेत. कर्ता, कर्म व क्रियापद, क्रिया करणारा कर्ता, ज्याच्यावर क्रिया घडते ते कर्म कर्ता व कर्म ह्यांचा क्रियापदाशी संबंध असतोच. हा संबंध कर्ता किंवा कर्म यांच्या लिंग, वचन, पुरूष ह्या संदर्भात असतो. क्रियापदाचे कार्त्याशी किंवा कर्माशी येणारा संबंध म्हणजेच प्रयोग होय. मुख्य प्रयोग तीन आहेत :

१) कर्तरी प्रयोग २) कर्मणी प्रयोग ३) भावे प्रयोग .

**१. कर्तरी प्रयोग :** अ) कर्तरी प्रयोगात कर्त्याची विभक्ती प्रथमा असते

ब) कर्माची विभक्ती द्वितीया असते.

क) कर्त्याच्या लिंग, वचनाप्रमाणे क्रियापद बदलते.

कर्तरी प्रयोगाचे दोन प्रकार : अ) सकर्मक कर्तरी  ब) अकर्मक कर्तरी

अ) सकर्मक कर्तरी प्रयोग *

कर्तरी प्रयोगात जर कर्म असेल तर तो सकर्मक कर्तरी प्रयोग होय.

कर्त्याच्या लिंग प्रमाणे क्रियापद बदलते.

उदा : 1. अनिल पुस्तक वाचतो. 2. संगीता पुस्तक वाचते..

कर्त्याच्या वचनाप्रमाणे क्रियापद बदलते. उदा:1. मुलगा चित्र काढतो. 2. मुले चित्र काढतात.

ब) अकर्मक कर्तरी प्रयोग कर्तरी प्रयोगात कर्म नसेल तर तो अकर्मक कर्तरी प्रयोग

उदा- 1. राणी हसते. 2. पार्वती झोपते. (कर्म नाही)

**2. कर्मणी प्रयोग :** कर्माचे जे लिंग, वचन तेच लिंग, वचन क्रियापदाचे असते. अशा रचनेस कर्मणी प्रयोग म्हणतात. कर्म प्रथमात असते. कर्माप्रमाणे क्रियापद चालते. कर्त्याची विभक्ती तृतीया असते.

उदा :1. सतीशने पेरू खाल्ला. 2. संगीताने सफरचंद खाल्ले, 3. अजयने काकडी खाल्ली.

कर्मणी प्रयोगाचे पाच उपप्रकार पडतात.

1. प्राचीन कर्मणी प्रयोग किंवा पुराण कर्मणी प्रयोग

2. नवीन कर्मणी प्रयोग  3. समापन कर्मणी प्रयोग

4. शक्य कर्मणी प्रयोग   5. प्रधान कर्ता कर्मणी प्रयोग

( note – सरळ सेवे मध्ये खोलवर विचारत नाहीत )

# समास

मराठी व्याकरणामधी दोन किंवा दोनपेक्षा अधिक शब्दामधील विभक्ती प्रत्यय अथवा संबंध दर्शक शब्द गाळून त्या पासून जो एक संयुक्त शब्द बनविला जातो त्या पद्धतीस 'समास' असे म्हणतात आणि अशा प्रकारे या झालेल्या संयुक्त शब्दास मराठी व्याकरणात सामासिक शब्द म्हणतात.
उदा : 1. राजाचा वाडा - "राजवाडा" हा सामासिक शब्द •
मराठी व्याकरणात समाजाचे एकूण चार प्रकार आहेत
१) अव्ययीभाव समास - पहिले पद महत्वाचे
२) तत्पुरुष समास - दुसरे पद महत्वाचे
३) इंद्व समास - दोन्ही पदे महत्वाची
४) बहुव्रीहि समास - दोन्ही पदे गौण ( तिसऱ्याच पदाचा बोध होतो )

१) अव्ययीभाव समास - या समासात पहिले पद महत्वाचे असते .
दरसाल प्रत्येक साली हरघडी प्रत्येक घडीला
यथाशास्त्र शास्त्राप्रमाणे यथायोग्य योग्य असे. दिवसेंदिवस प्रत्येक दिवशी
क्षणोक्षणी प्रत्येक क्षणाला
२) तत्पुरुष समास -
दुसरे पद महत्वाचे म्हणजेच ज्या समासात दुसरे पद महत्वाचे असून समासाचा विग्रह करतांना गाळलेल्या शब्द, विभक्तीप्रत्यय लिहावा लागतो, त्यास तत्पुरुष समास असे म्हणतात.थोडक्यात ज्या समासात दूसरा शब्द प्रधान / महत्वाचा असतो त्यास तत्पुरुष समास असे म्हणतात.
उदा : १) महामानव - महान असलेला मानव
२) राजपुत्र - राजाचा पुत्र
३) तोंडपाठ - तोंडाने पाठ
४) गायरान - गाईसाठी रान
५) वनभोजन - वनातील भोजन

तत्पुरुष समासाचे काही उपप्रकार पुढीलप्रमाणे \-

**१ -विभक्ती तत्पुरुष समास**

# शब्दसिद्धी

**शब्दसिद्धी म्हणजेच शब्द कसा झाला ती सिद्ध करण्याची पद्धत म्हणजे शब्द होय.**

**१.) तद्भव शब्द -** संस्कृत भाषेतून मराठीत येताना त्या शब्दाच्या मूळ रूपात बदल होतो त्यास तद्भव असे म्हणतात .
उदा – घर, गृह, कोळा, कोमल, सासू, काम, कर्मघास, ग्रास, भाऊ, राहतो पाय पद सासरा ससुर इत्यादी.

**२.) तत्सम शब्द** जे संस्कृत शब्द मराठी भाषेत काही फरक न होता तसेच्या  तसे मराठी मध्ये आले आहेत त्यांना तत्सम शब्द असे म्हणतात .
उदा – भगवान, मस्त, कर, ग्रंथ, कर, कन्या, उत्सव, अरण्य, नदी, चल,

**3.) देशी शब्द** पुढील प्रमाणे_ झाड चिमणी दगड धोंडा बोका रेडा घोडा बाजरीपीठ खुळा ढेकूण इत्यादी

**४.) गुजराती शब्द** पुढील प्रमाणे_ शेठ मथळा, ढोकळा रिकामटेकडा डब्बा इजा घे दादर बदला सदरा इत्यादी

**५.) अरबी शब्द** पैज जाहीर जामीन उर्फ शहर मेहनत मुलामा मोजतात नक्कल इनाम खर्च मजबूत अर्ज जबाब इत्यादी

**६.) फारशी शब्द** पेशवा हकीकत सरकार जहांगीर गरीब महिला मेना पोशाख शाही समता हजार अब्रूषणाई दाऊत इत्यादी

.

**७.) कानडी शब्द** चिरगुट अक्का पडवळ अण्णा शिकेकाई भांडे अडकित्ता खलबत्ता लवंगी वेळी चाकरी ताई गुढी इत्यादी.

.

**८.) पोर्तुगीज शब्द** तुरुंग, बटाटा, बटवा, तंबाखू, जागरी, फॅमिली, तिजोरी, पोर.

.

- **साधितशब्द** - साधितशब्दांच्या मागे उपसर्ग किंवा पुढे प्रत्यय लावून जे शब्द तयार होतात त्यांना साथ शब्द असे म्हणतात
  उदाहरणार्थ - कर पासून करिता, करीन, करणारा, इत्यादि

# विरामचिन्ह याविषयी माहिती .

| क्र | चिन्हहाचे नाव | चिन्ह | केव्हा वापरतात | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| 1 | पूर्ण विराम | . | 1 ) विधान किंवा वाक्य पूर्ण झाले हे दाखवण्यासाठी<br>2 ) शब्दांचा संक्षेप दाखवण्यासाठी आद्याक्षरांपूढे | तो घरी गेला .<br>ता. क. ताजा कलम |
| 2 | आर्धविराम | ; | 1 )दोन छोटी वाक्य उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात | ढग खूप गर्जत होते ;पण पाऊस नाही. |
| 3 | स्वल्प विराम | , | 1 )समान वाक्ये निराळी दाखविण्याकरता.<br>2) एकाच वाक्यात दोन पेक्षा अधिक शब्द आले असता. | हुशार , अभ्यासू , खोडकर, सुरेश इकडे ए, |
| 4 | अपूर्णविराम | : | वाक्याच्या शेवटी तपशील द्यायचा असल्यास | पुढील विद्यार्थी नापास झाले: 1,2,12, |
| 5 | प्रश्नचिन्ह | ? | प्रशनार्थक वाक्याच्या शेवटी . | तू केव्हा आलास? |
| 6 | उद्गारवाचक चिन्ह | ! | उत्कट भावना व्यक्त करताना ती दाखविणाऱ्या शब्दाच्या शेवटी वापर होतो | अरेरे ! तो पडला<br>अरेरे ! तो फसला |
| 7 | अवतरण चिन्ह | " " | एखाद्या वाक्यावर जोर द्यावयाचा असल्यास<br>एखाद्याच्या व्यक्तीचे तोंडचे शब्द जसेच्या तसे घेतले असता . | तो म्हणाला<br>"मी येईन " |
| 8 | संयोगचिन्हे | - | दोन शब्द जोडताना<br>ओळीच्या शेवटी शब्द अपुरा असल्यास | विद्यार्थी – भंडार |
| 9 | अपसार चिन्ह | - | बोलता बोलता विचार मालिका तुटल्यास<br>स्पष्टीकरण द्यायचे असल्यास | मी तिथे गेलो, पण- |

( सूचना - 8 ,9 दोन्ही सारखी दिसत असली तरी त्यांचे नाव व काम वेगवेगळी आहेत , कृपया लक्षात घ्यावे . )

# समानार्थी शब्द

| आनंद – हर्ष, मोद, संतोष | डोके – माथा, मस्तक, शिर, शीर्ष |
|---|---|
| आरसा – दर्पण , मुकूर<br>अग्नि – निखारा – अनल, पावक<br>अरण्य – रान, वन, कानंन, विपिन ,<br>अश्व – घोडा, वारू, तुरंग, वाजी | घर - सदन, भवन, गृह, गेह, आलंय<br>चंद्र - इंदु, शशी, विधू, सोम, हिमांशु<br>ढग - जलद, अंबुद, पयोधर, पयोद<br>नवरा - पती, वल्लभ |

## मराठी म्हणी

- ✓ आपला हात जगन्नाथ – आपले कर्तुत्व आपल्या हातात असते.
- ✓ चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे - प्रत्येकाची वेळ येत असते .
- ✓ उंटावरचा शहाणा - मूर्ख सल्ला देणारा माणूस .
- ✓ आईजीच्या जीवावर बाईजी उदार -दुसऱ्याचा पैसा खर्च करून शहाणपण दाखविणे.
- ✓ नाचता येईना अंगण वाकडे – आपल्याला कामे हॅाट नसल्यास त्यातील दोष दाखवणे.
- ✓ छत्तीसाचा आकडा -अकमेकां विषयी विरुद्ध मत असणे
- ✓ आंधळे दळते कुत्रं पीठ खाते – एक जन काम करतो आणि दुसरा त्याचा फायदा घेतो.
- ✓ तेरड्याचा रंग तीन दिवस - एखादे कार्य थोडे दिवस जोरात चालून एकदम बंद पडणे
- ✓ आधी पोटोबा मग विठ्ठोबा - आदी पोटाची सोय पाहावी नंतर देवधर्म करावा.
- ✓ अडला हरी गाढवाचे पाय धरी – अडचणीच्या वेळी मूर्ख माणसाचे सुद्धा पाय पकडावे लागतात
- ✓ आंधळा मागतो एक डोळा, देव देतो दोन डोळ - अपेक्षेपेक्षा जास्त फायदा होणे.
- ✓ अति शहाणा त्याचा बैल रिकामा - जो माणूस फार शहाणपणा करायला जातो. त्याचे मुळीच काम होत नाही.
- ✓ आधी शिदोरी मग जेजूरी - आधी भोजन मग देवपूजा
- ✓ दुष्काळात तेरावा महिना - संकटात अधिक भर होणे .
- ✓ असतील शिते तर जमतील भुते - एखाद्या माणसाकडून फायदा होणार असला की त्याच्या भोवती माणसे गोळा होतात.
- ✓ नव्याचे नऊ दिवस - नवेपणा असतानाचे कौतुक नंतर कोणी विचारत नही .
- ✓ अचाट खाणे मसणात जाणे - खाण्यापिण्यात अतिरके झाल्यास परिणाम वाईट होतो.
- ✓ आई जेवू घालीना बाप भीक मागू देईना -दोन्ही बाजूंनी अडचण
- ✓ आलीया भोगाशी असावे सादर - कुरकुर न करता निर्माण झालेली परिस्थिती स्वीकारणे.
- ✓ आवळा देऊन कोहळा काढणे - क्षुल्लक गोष्टीचा मोबदल्यात मोठा लाभ करून घेणे.
- ✓ अंथरूण पाहून पाय पसरावे - आपल्या ऐपतीप्रमाणे खर्च ठेवावा.
- ✓ कामापुरता मामा - काम साधण्यापुरते गोड बोलणे
- ✓ आपलेच दात आपलेच ओठ - आपल्याच माणसाने चूक केल्यावर अडचणीचे स्थिती निर्माण होणे.

## वाकप्रचार

- अंगात वीज संचारणे- अचानक बळ येते.
- कपाळाला हात लावणे- हताश होणे, निराश होणे.
- अंगाची लाही लाही होणे- अतिशय संताप येणे.
- कंबर कसणे- एखादी गोष्ट करण्यासाठी हिमतीने तयार होणे.
- कंठस्नान घालने – ठार मारणे.
- केसाने गळा कापणे- विश्वासात घेऊन विश्वास घात करणे.
- कान फुंकणे- दुसऱ्याच्या मनात कल्शिक निर्माण करणे, चूगली करणे.
- अंग चोरून काम करणे – फारच थोडे काम करणे.
- अंगवळणी पडणे- सवाय होणे.
- कपाळमोक्ष पडणे- मृत्यू ओढवणे.
- काढता पाय घेणे: गंभीर किंवा विरोधी परिस्थिती पाहून निघून जाणे.
- कान टोचणे- चूक लक्षात आणून देणे.
- कान उपटणे- कडक शब्दांत समजावणे.
- कानावर घालने- लक्षात आणून देणे.
- खांद्याला खांदा भिडवने: सहकार्याच्या भावनेने काम करणे, एकजुटीने काम करणे.
- गळ्यात गळा घालने- खोल प्रेमाचे भावना असणे, खूप पक्की मैत्री असणे.
- चेहरा खुलणे- चेहऱ्यावर आनंदाचा भाव येणे.
- चेहरा पडणे- एखाद्या गोष्टीची लाज वाटणे.
- छातीत धडधडणे- खूप भीती वाटणे.
- जिभेला हाड नसणे- वाटेल ते बोलणे.
- जीव की प्राण असणे- अत्यंत प्रिय असणे.
- डोक्यावर खापर फोडणे- चूक नसतानाही एखाद्याला दोषी ठरवणे.
- डोळा आसणे- नजर असणे.

# शब्दसमूहाबद्दल एक शब्द

- अनुज - मागाहून जन्मलेला ( धाकटा भाऊ )
- अन्नछत्र - मोफत अन्न मिळण्याचे ठिकाण
- कृतघ्न - केलेले उपकार विसरणारा
- जगन्नाथ - जगाचा स्वामी
- जन्मगुण - जन्मापासून उपजत गुण
- जयंती - थोर पुरुष, समाजसेवक, साधुसंत ह्यांच्या जन्मतिथीचा दिवस
- जन्मदरिद्री - जन्मापासून कायमचा दरिद्री
- जमीनदार - पुष्कळ जमीन असलेला
- अष्टावधाणी - एकाच वेळी अनेक अवधाने राखून काम करणारा
- अद्वेत - परमेश्वराशी एकरूप होणे
- आमरण - मरण येईपर्यंत
- अपाद मस्तक - पायापासून डोक्यापर्यंत
- आस्तिक - देव आहे असे मानणारा
- नास्तिक - देव नाही असे मानणारा
- जन्मभूमी - जेथे जन्म झालेला आहे तो देश
- कृतज्ञ - केलेले उपकार जाणणारा
- गर्भ श्रीमंत - जन्मत श्रीमंत असलेला
- एकलकोंडा - सतत एकटे राहण्याची आवड असलेला
- अंगाई गीत - लहान मुलाला झोपण्यासाठी म्हटलेले गीत
- अभूतपूर्व - पूर्वी कधीही न ऐकलेले
- अंगचोर - अंग राखून काम करणारा .
- कर्ण मधुर - कानास गोड लागणारे
- कामधेनु - सर्व इच्छा पूर्ण करणारी गाय
- गिरीजन - डोंगरात राहणारे लोक
- चक्रपाणी - ज्याच्या हातात चक्र आहे असा ( कृष्ण )
- चंद्रमुखी - ज्याचे मूख चंद्राप्रमाणे आहे अशी

© All right reserved @mpscshorts – 2024 ( education perpose only don’t violate coppyright Act )

#Udyam registation number - MH-25-0036092

## सजीव – निवास

- पक्षी - घरटे
- माणसाचे - घर / सदन
- मुंग्याचे - वारूळ
- हत्तीचा – हत्तीखाना
- उंदराचे – बीळ कों
- बडीचा – खुराडा
- घोड्याचा - तबेला
- देवाचे - मंदिर
- वाघ / सिंहाची – गुह
- मधमाशीचे - पोळे
- रामाचे घर – साकेत
- गाई-म्हशींचा - गोठा
- किटक - जाळे
- सापाचे - बीळ
- घर नसलेला- बेघर/अनिकेत
- पोपटाची - पिंजरा/ढोली

## प्राणी – पिल्ल

- ✓ गायीचे वासरू
- ✓ म्हशीचे रेडकू/पारडू
- ✓ वाघाचा बछडा
- ✓ माणसाचे बाळ
- ✓ कुत्रा मांजरीचे -पिल्लू
- ✓ गाईचे कालवड
- ✓ हरणीचे पाडस
- ✓ घोड्याचे शिंगरू
- ✓ सिंहाचा बछडा
- ✓ फुलपाखराचे सुरवंट
- ✓ शेळीचे कोकरू

## प्रसिद्ध व्यक्ती - विशेषण

- ➢ मर्यादा पुरुषोत्तम - श्रीराम
- ➢ धर्मराज - युधिष्ठिर
- ➢ पवनपुत्र - हनुमान
- ➢ मातृ-पितृभक्त - श्रवण बाळ
- ➢ झोपाळू - कुंभकर्ण
- ➢ महात्मा – गांधीजी
- ➢ लोकशाहीर – अन्नाभाऊ साठे

# आत्मचरित्र

- प्रकाशवाटा - प्रकाश आमटे
- एकटा जीव - दादा कोंडके
- अग्नीपंख - ए.पी.जे. अब्दुल कलाम
- राजू शेट्टी - शिवार ते संसद
  नरेंद्र जाधव - आमचा बाप आणि आम्ही
- सिंधुताई सपकाळ - मी वनवासी
- मलाला युसुजाई - आय एम् मलाला
- स्वत:विषयी - अनील अवचट
- लालकृष्ण अडवाणी- माय कंट्री माय लाईफ
  अण्णा हजारे - माझे गाव माझे तीर्थ
- पी एम संगमा - बियोंड रीजर्वेशन
- मुसाफिर - अच्च्युत गोडबोले
- जेव्हा माणूस जागा होतो-गोदावरी परुळेकर
- राजमाता - वि स वाळिंबे
- उपरा- लक्ष्मण माने.
- उचल्या- लक्ष्मण गायकवाड

# लेखक व त्यांचे साहित्य

- संत एकनाथ - भागवत
- बंकिमचंद्र चॅटर्जी - आनंदमठ
- रा ग कडकरी - एकच प्याला
- संत तुकडोजी महाराज - ग्रामगीता
- विनोबा भावे–गीताई / महाराष्ट्र धर्म
- रणजीत देसाई-स्वामी श्रीमान योगी
- संत तुकाराम - अभंग गाथा
- संत रामदास-दासबोध मनाचे श्लोक
- मोरोपंत - केकावली
- रवींद्रनाथ टागोर - गीतांजली
- लोकमान्य टिळक - गीता रहस्य
- विशाखादत्त - मुद्राराक्षस
- विश्राम बेडेकर - रणांगण
- शिवाजी सावंत - मृत्युंजय छावा वि वा
  शिरवाडकर - नटसम्राट विशाखा
- कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर - द्रोपदी / कीचकवध
- शंकरराव खरात - तराळ अंतराळ
- नामदेव धसाळ - गोलपिठा
- वाल्मिकी - रामायण
- ग. दी . माडगूळकर - गीत रामायण
- व्यासमुणी - महाभारत
- मुकुंदराज - विवेकसंदू
- वि .स .खांडेकर - ययाती
- कालिदास - शाकुंतल मेघदूत
- लक्ष्मण माने - उपरा
- शिवाजी कोण होता - गोविंद पानसरे
- बनगरवाडी - व्यंकटेश माडगूळकर
- मुक्ती संग्राम - शंकरराव खरात
- आय डेअर - किरण बेदी

# साहित्यिक व त्यांची विशेष नावे ( टोपण नावे )

- आनंदघन - लता मंगेशकर
- संत नामदेव - नामदेव दामाशेटी शिंपी
- मोरोपंत - मोरोपंत रामचंद्र पराडकर
- अज्ञातवासी - दिनकर गंगाधर केळकर
- केशवसुत - कृष्णाजी केशव दामले
- गोविंद - गोविंद त्र्यंबक दरेकर
- गीतरामायणकार - ग. दि. मांडगूळकर
- बालगंधर्व - नारायण राजहंस
- सानेगुरुजी - पांडुरंग सदाशिव साने
- माधवानुज - काशिनाथ हरी मोडक
- दत्त - दत्तात्रय कोंडो घाटे
- रानकवी - ना. धो. महानोर
- राजकवी - भा. रा. तांबे
- ग्रेस - माणिक गोडघाटे
- यशवंत - यशवंत दिनकर पेंढारकर
- संत एकनाथ -एकनाथ सूर्यनारायण पंत
- अनिल - आत्माराम रावजी देशपांडे
- चंद्रशेखर - चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे
- गोविंदाग्रज - राम गणेश गडकरी
- लोकहितवादी - गोपाळ हरी देशमुख
- केशवकुमार - प्रल्हाद केशव अत्रे
- बाळकराम - राम गणेश गडकरी
- फुलामुलांचे कवी. - ना. वा. टीळक
- गिरीश,- शकर केशव कानेटकर
- दिवाकर - शंकर काशिनाथ गर्गे
- नाथमाधव - द्वारकानाथ माधव पितळे
- विनायक - विनायक जनार्दन करंदीकर
- बी - नारायण - मुरलीधर गुप्ते
- मनमोहन - गोपाळ नरहर नातू
- धनुर्धारी - रा. वि. टिकेकर
- महाराष्ट्र कवी - यशवंत दिनकर पेंढारकर
- संत रामदास - नारायण सूर्याजीपंत ठोसर
- संत तुकाराम - तुकाराम बोल्होबा आंबिले
- आरती प्रभू - चिंतामण त्र्यंबक खानोलकर
- तुकडोजी महाराज - माणिक बंडोजी ठाकूर
- बालकवी / निसर्ग कवी - त्र्यंबक बापूजी ठोंबरे
- माधव ज्युलिअन - माधव त्र्यंबक पटवर्धन
- संत ज्ञानेश्वर - ज्ञानेश्वर विठ्ठल कुलकर्णी
- पठ्ठे बापूराव - श्रीधर कृष्णाजी कुलकर्णी
- विंदा करंदीकर - 'गोविंद विनायक करंदीकर
- संत गाडगे महाराज - डेबूजी झिंगराजी जाणोरकर



















sureshmaza@kotak

Scan & pay >

Suresh narayan kumbhar

**यात तुम्हाला मिळणार... !!**

1. कोणत्याही एका विषयाची नोट्स किंमत = ५०/- रुपये
2. कोणत्याही दोन विषयाच्या नोट्स = ८०/- रुपये
3. सर्व नोट्स एकत्र घेतल्यास = २०० रुपये फक्त /-

**यातिल कोणत्याही नोट्स घेतल्यास सोबत मिळणार [ चालू घडामोडी मासीक चालू महिना ]**

**( पैसे पाठवल्या नंतर +917709043437 या नंबर वर स्क्रीनशॉट पाठवा )**

आधिक माहितीसाठी संकेतस्थळाला भेट द्या

www.mpscshort.in

( Teligram चेनल जॉइन करा आणि मिळवा सर्व स्पर्धा परीक्षा अपडेट मोफत @mpscshorts )



© All right reserved @mpscshorts – 2024 ( education perpose only don't violate coppyright Act )
#Udyam registation number - MH-25-0036092 Mail - contact@mpscshort.in / +917709043437